# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०३/०४/२०२४ (बुधवार) सकाळ

---

### खुनाचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

पोस्टे पारशिवनी :— अंतर्गत मौजा ढिवर मोहोल्ला पारशिवनी येथे फिर्यादी नामे— सौ. हिराबाई मारोती केळवदे, वय ६५ वर्ष, रा. ढिवर मोहल्ला पारशिवनी, वार्ड नं. ०४ हिचे पती नामे मारोती केळवदे हे घरासामोरील छपरात बाजेवर झोपुन असता घरासमोर राहणारा **आरोपी इसम नामे नामदेव धोंडोबा मोहनकर वय ६२ वर्ष रा. ढिवर मोहल्ला पारशिवनी** याने फिर्यादीचे पतिचे डोक्यावर सब्बलने मारून गंभीर जखमी केले. अशा फिर्यादी यांचे रीपोर्ट वरून पोस्टे पारशिवनी येथे अप क्र. ११२/२४ कलम ३०७, ४५२ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार पोस्टे पारशिवनी येथील तपास पथक हे आरोपीचा सतत शोध घेत फिरत असताना गुप्त बातमीदाराद्वारे माहिती मिळाली की, आरोपी **नामदेव धोंडोबा मोहनकर वय ६२ वर्ष रा. ढिवर मोहल्ला पारशिवनी** हा ढिवर मोहल्ला पारशिवनी परीसरात फिरत असल्याची माहिती मिळाली. ढिवर मोहल्ला पारशिवनी येथे सापळा रचुन आरोपीस ताब्यात घेण्यास पारशिवनी पोलीसांना यश आले. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि शिवाजी भताने पोस्टे पारशिवनी मो. नं. ९५५२८०४३८८ हे करीत आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से.) पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, मा. श्री. रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे मार्गदर्शनात पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोलीस निरीक्षक राजेशकुमार थोरात, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी भताने, पोलीस अंमलदार विरेंद्र सिंग यांनी पार पाडली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर